**प्रेसनोट** दि. 25/10/2026

| अ.क्र | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | घटक | **पुणे घटक** |
| 2 | तक्रारदार | पुरुष, वय 60 वर्षे |
| 3 | आरोपी | लोकसेवक जहीर सिराज शेख, वय 47 वर्ष, पद- वनपाल, (वर्ग-3), करंजे राऊंड ऑफिसर, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, बारामती रा. शेखर गाडे यांचे खोलीत, बी/5, निशिका अपार्टमेंट जळूची रोड, जिजाऊ मंगल कार्यालय शेजारी बारामती , पुणे. |
| 4 | तक्रार | यातील तक्रारदार यांनी दि. 14/10/2026 रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांची कोन्हाळे खुर्द येथे 4 हेक्टर शेत जमीन असून सदर शेतातील माती पावसामुळे नीरा नदीत वाहून गेली होती म्हणून ते नदीपात्रातील माती शेतात टाकत असताना यातील लोकसेवक जहीर शेख यांनी दिनांक 26/09/2026 रोजी तक्रारदारांचे काम बंद करून सदरची जागा फॉरेस्टच्या मालकीची असल्याचे सांगितले व तक्रारदार यांचेवर कारवाई करण्याची भीती घालून, माती भराव करण्यास मज्जाव केला होता. सदर वेळी तक्रारदार यांनी लोकसेवकांना कारवाई न करता काम बंद न पाडण्यासाठी विनंती केली असता, लोकसेवक जहीर शेख यांनी कारवाई न करता काम सुरू ठेवण्याकरीता त्यांच्या सहकारी भुमरे मॅडम व स्वतःसाठी 10,000/- रुपये लाचेची मागणी करून 4000/- रुपये त्याच दिवशी स्वीकारले होते व उर्वरित 6,000/- रुपये दिल्याशिवाय काम सुरू करू नका असे बोलून उर्वरित 6,000/- रुपये लाचेची मागणी तक्रारदार यांच्याकडे केली होती. |
| 5 | तक्रारीची पडताळणी | तक्रारदारांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी दिनांक 23/10/2026 रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाईदरम्यान आरोपी लोकसेवक जहीर शेख, वनपाल यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष 10,000/- रूपये लाचेबाबत बोलणी करून यापूर्वी 4,000/- रूपये स्वीकारल्याचे मान्य करून उर्वरित 6,000/- रुपये लाचेची मागणी करून सदर रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. |
| 6 | सापळा कार्यवाही | वर नमुद प्रमाणे लाच मागणीच्या अनुषंगाने दिनांक 25/10/2026 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आरोपी लोकसेवक वनपाल जहीर शेख यांनी तक्रारदार यांचे कडून हॉटेल शिवकृपा, आय.टी.आय. माळेगाव समोर, माळेगाव, बारामती येथे लाचेची रक्कम रुपये 6,000/- पंचासमक्ष स्वीकारली असता 14.17 वा. रंगेहात ताब्यात घेण्यात आले आहे. |
| 7 | गुन्हा रजि.नं./ कलम /पोलीस स्टेशन / जिल्हा,दिनांक व वेळ | आलोसे यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 चे कलम 7 प्रमाणे माळेगाव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| 8 | आरोपी अटक दिनांक, वेळ | आरोपी लोकसेवक नामे जहीर सिराज शेख, वय 47 वर्ष, पद वनपाल, वर्ग (3), करंजे राऊंड ऑफिसर, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय बारामती यांना दि. 25/10/2026 रोजी 14.17 वा.ताब्यात घेतले आहे. |
| 9 | सापळा अधिकारी | श्री. संतोष पाटील, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे मो.नं. 8806321817 |
| 10 | पर्यवेक्षण अधिकारी | श्री.सतिश वाळके,पोलीस उप अधीक्षक,ला.प्र.वि, पुणे, मो. नं. 8087002020 |
| 11 | सापळा पथक | 1) पो.कॉ./1966 प्रवीण तावरे, 2) मपोशि/7934 वैशाली माकर,<br>3) श्रेणी पो उपनिरी श्री अविनाश चव्हाण. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे. |
| 12 | मार्गदर्शन | 1)श्री.शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक,ला.प्र.वि.पुणे, मो.नं.-9823167154<br>2)श्री.अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक-1,ला.प्र.वि.पुणे,मो.नं. 9029030530 |

**13** लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुद्ध तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमूद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

| | **घटक कार्यालय** | **परिक्षेत्र कार्यालय** | **ला.प्र.वि, मुख्यालय** |
|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 |
| पत्ता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालय, सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे, 411001 | पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र,सी बराक, सेंट्रल बिल्डिंग, पुणे, 01 | ला.प्र. वि. मुख्यालय कार्यालय, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई, 400030 |
| दुरध्वनी क्रमांक, व्हॉटसअप क्रमांक | (020)26132802, व्हॉटस्ॲप क्र.9403781064, 1064 | (020) 26122134, 1064 | (022) 24921212 |
| ई- मेल आय.डी. | dyspacbpune@mahapolice.gov.in | spacbpune@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

DySP 25/10.

( सतिश संभाजी पालक )

सहा. पोलीस आयुक्त/पो. उप. अधिक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे.